

साप्ताहिक

संघर्षाचा आवाज

प्रशासकीय व सामाजिक व्यवस्थेचा समतोल साधणारा...

पुणे, ठाणे आणि मुंबईसह महाराष्ट्रातील घडामोडींचा वेध घेणारे वृत्तपत्र

संपादक : संजय सोनवणे

■ RNI. NO. MAHMAR/2013/52905
■ DECL. NO. SDM/SR/11/2013
■ https://sangharshachaaawaz.in

■ वर्ष : १४ वे ■ अंक : १५ वा ■ सोमवार दि.०२ नोव्हेंबर ते ०८ नोव्हेंबर २०२६ ■ किंमत : २ रु. ■ पाने – १२

पुणे शहरात अनधिकृत रस्ता खोदाई जोरात असताना सत्ताधारी, विरोधक, विविध गटनेते आणि प्रशासन प्रमुख नक्की करतात तरी काय?

मे.गेरा.डेव्हलमेंट प्रा.लिमिटेड यांना रस्ता खोदाईसाठी ४ कोटी २६ लाख ७२ हजार रूपये घेता मग दुसऱ्या विकसकाकडे दुर्लक्ष करण्यामागे दडलंय काय?





खुळेवाडी, खराडी सबस्टेशन रोड, नगररोड, चोखीदाणी रस्ता येथे अनधिकृतपणे खोदाई करत असताना





कॅम्प जीपीओ पोस्ट ऑफीसजवळ एमएनजीएल कंपनीकडून अनधिकृत खोदकाम करत असताना जलवाहिनी फुटली

*खुळेवाडी, खराडी सबस्टेशन रोड, नगररोड, चोखीदाणी रस्ता येथे मे.गेरा.डेव्हलमेंट प्रा.लिमिटेड यांना विद्युत लाईन टाकणेसाठी ओपन ट्रेंचिंग पध्दतीने फुटपाथ, माती, टक्ट मधून खोदाई करण्यास परवानगी मिळणेसाठी ४ कोटी २६ लाख ७२ हजार रूपये खोदाई शुल्क आकारण्यात आले. मग तेवढ्याच अंतरावर दुसऱ्या विकसकासाठी विद्युत लाईन टाकण्यासाठी मोठ्या प्रमाणात दिवसरात्र अनधिकृतपणे खोदाई चालू असताना त्याकडे पथ विभागातील कनिष्ठ अभियंता आणि उपअभियंता दुर्लक्ष करण्यामागे काय कारण असू शकते?

*साप्ताहिक संघर्षाचा आवाजच्या माध्यमातून खुळेवाडी, खराडी सबस्टेशन रोड, नगररोड, चोखीदाणी रस्ता येथे खोदाई चालू असलेबाबत उपअभियंता श्रीमती सायली सुर्यवंशी यांना विचारले असता ते म्हणतात की वाघोली नविन हद्दीतील गाव आहे व तेथे डीपी मंजूर नाही पण आरपी मंजूर आहे. त्यामुळे तो रस्ता आमच्याकडे येत नाही.

तसेच पथ विभागाचे कनिष्ठ अभियंता राहुल आवारकर साहेब म्हणतात की, आम्ही जागेवरती साईटवर गेलो व संबंधित काम बंद करण्यास सांगितले असता ते म्हणाले की, ती आमची खासगी जागा आहे. तेंव्हा मी त्यांना जागेसंदर्भात कागदपत्रे सादर करण्यास सांगितले आहे.

*पथ विभागाचे कार्यकारी अभियंता संजय धारव यांना संपर्क साधला असता त्यांनी कनिष्ठ अभियंता श्री.राहुल आवारकर यांना कॉन्फरन्सवर घेवून विचारले असता त्यांनी थेट आदेश दिले की, तुमच्या बरोबर अन्य ३ ते ४ जण संबंधित ठिकाणी जावून रस्ता किती खोदला आहे? त्यांनी परवानगी घेतली आहे का? सविस्तर पाहणी करून पंचनामा करून संबंधितांना दंडात्मक कारवाईची नोटीस देण्यात यावी.

*पुणे कॅम्प जीपीओ पोस्ट ऑफीसजवळ MNGL कंपनीकडून खोदकाम करत असताना १० ते १२ इंचाची जलवाहिनी फुटल्याने तेथे मोठ्या प्रमाणात लोकांनी गर्दी केली. तेंव्हा विचारण्यात आले की, कामाचा कार्यादेश आहे का तेव्हा ठेकेदारांनी सांगितले सध्या कार्यादेश मिळालेला नाही. पण लवकरच मिळणार आहे. म्हणून काम चालू आहे.

पाणीपुरवठा विभागाकडून ताबडतोब जलवाहिनी दुरूस्त करण्यात आली. पण पाणीपुरवठा विभागाकडून दंडात्मक कारवाईची नोटीस देण्यात आली का? यासाठी वारंवार चौकशी केली तेंव्हा पाणीपुरवठा विभागाने या दुरूस्तीचा खर्च एकूण २,५४,७७५/-रूपये पथ विभागाने पाणीपुरवठा विभागाकडे करावा. म्हणून दि.२९/१०/२०२६ रोजी पत्रव्यवहार करण्यात आला आहे. ही घटना घडली दि.२३/१०/२०२६ रोजी

*पावसाळ्यापुर्वी पुणे महापालिकेकडून प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयनिहाय ३.५ ते ४ कोटींची कामे लावण्यात आली होती. असे एकूण ५२ ते ६२ कोटींची कामे होती. यामध्ये विविध रस्त्यावर पाणीपुरवठा वाहिनी, मल:निसारण वाहिनी, गॅस वाहिनी, वीज वाहिनी तसेच केबल खोदाईचे रिईन्स्टेटमेंट करणे तसेच तदनुषंगिक कामे व इतर कामेही करणे असे असताना आज पुणे महापालिकेने रिईन्स्टेटमेंट कामासाठी एकूण रक्कम ५७,९०,४०,८२८/- (सत्तावन्न कोटी नव्वद लाख चाळीस हजार आठशे अठ्ठावीस रूपये) ची कामे काढण्यात आली आहेत. प्रश्न असा आहे की, पावसाळा संपून महिनापुर्ण झाला नाही. पावसाळ्यापुर्वी करण्यात आलेल्या कामाचा अहवाल प्राप्त झाला नाही? पण जवळ-जवळ बिल काढण्यात आले आहे? मग या कामाची घाई नक्की कशासाठी असा प्रश्न पुणेकरांना पडला आहे.

पुणे : शहरात गेल्या काही वर्षांपासून विद्युत सेवावाहिन्या, जलवाहिनी, मलवाहिनी, मोबाईल व इंटरनेट यासंह (पान ६ वर)

महापालिकेच्या १८ हजार कर्मचाऱ्यांना बोनस; ११ हजार कंत्राटी कामगारांना बक्षीस – स्थायी समितीची मान्यता





हप्तेवाढीपोटी बोनसपेक्षा अतिरिक्त रक्कम

२०२५-२६ : २७ हजार रुपये, २०२६-२७ : २९ हजार रुपये, २०२७-२८ : ३१ हजार रुपये, २०२८-२९ : ३३ हजार रुपये, २०२९-३० : ३५ हजार रुपये

११ हजार कंत्राटी कामगारांनाही लाभ

कंत्राटी कामगार : सुमारे ११ हजार, प्रत्येकी बक्षीस : १० हजार रुपये, अपेक्षित एकूण खर्च : ११ कोटी रुपये, निर्णय : स्थायी समितीची मान्यता

पुणे महानगरपालिकेच्या सेवकांना आज पहाटेपर्यंच्या बैठकीत बोनस लागू करण्यात आला आहे. महापौर, आयुक्त, स्थायी समिती अध्यक्ष, सभागृह नेता, सर्व पक्षनेते, सभासद यांचे मनपूर्वक आभार कामगार युनियनचे अध्यक्ष उदय भट, पीएमसी एम्प्लॉइज युनियन अध्यक्ष बलराज पोखरकर, कार्याध्यक्ष मधुकर नरसिंगे तसेच कामगार हितरक्षक संघाने आणि कामगार क्षेत्रात काम करणाऱ्या इतर संघटनांनी व्यक्त केले.

पुणे : पुणे महापालिकेतील सुमारे १८ हजार अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान (बोनस) देण्याच्या गटनेत्यांच्या प्रस्तावाला आणि ११ हजार कंत्राटी कामगारांना प्रत्येकी दहा हजार रुपये बक्षीस देण्याच्या उपसुचनेसह स्थायी समितीने मान्यता दिली. यंदा नियमित कर्मचाऱ्यांना वेतनाच्या ८.३३ टक्के रकमेसह २७ हजार रुपये अतिरिक्त अनुदान मिळणार आहे. या अतिरिक्त रकमेत दरवर्षी दोन हजार रुपयांची वाढ होणार असून, २०२९-३० मध्ये ती ३५ हजार रुपयांपर्यंत पोहोचणार आहे, अशी माहिती स्थायी समितीचे अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांनी दिली.

महापालिकेतील अधिकारी, कर्मचारी, रोजंदारी कामगार, माध्यमिक व तांत्रिक शिक्षण विभागातील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी, प्राथमिक शिक्षण विभागातील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी तसेच बालवाडी शिक्षिका आणि सेविकांना या निर्णयाचा लाभ मिळणार आहे. सन २०२५-२६ ते २०२९-३० या पाच आर्थिक वर्षांसाठी सानुग्रह अनुदानाचा करार करण्यात येणार आहे.

महापालिकेतील कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान देण्याबाबत गटनेत्यांच्या बैठकीत निर्णय घेण्यात आला होता. महापौर मंजूषा नागपुरे यांनी या निर्णयाची माहिती दिली होती. त्यानुसार प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावाला स्थायी समितीने मान्यता दिली आहे. याबरोबरच महापालिकेच्या विविध विभागांमध्ये कार्यरत असलेल्या सुमारे ११ हजार कंत्राटी कामगारांना प्रत्येकी दहा हजार रुपये बक्षीस देण्याचा निर्णयही उपसुचनेद्वारे स्थायी समितीने घेतला आहे. यासाठी सुमारे ११ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे.

भिमाले म्हणाले, महापालिकेच्या दैनंदिन कामकाजात नियमित कर्मचाऱ्यांबरोबरच कंत्राटी कामगारांचेही महत्त्वाचे योगदान आहे. त्यामुळे नियमित कर्मचाऱ्यांना बोनस देतानाच ११ हजार कंत्राटी कामगारांनाही प्रत्येकी दहा हजार रुपये बक्षीस देण्याचा निर्णय घेतला आहे. नियमित कर्मचाऱ्यांच्या बोनसची पाच वर्षांसाठी निश्चिती केली असून, अतिरिक्त रकमेत दरवर्षी दोन हजार रुपयांची वाढ होणार आहे. महापालिकेच्या कामकाजात योगदान देणाऱ्या सर्व घटकांच्या हिताचा विचार करून स्थायी समितीने या प्रस्तावांना मान्यता दिली आहे.

नव्याने नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना बोनस मिळण्यासाठी आवश्यक सेवा आणि हजेरीच्या अटींमध्ये शिथिलता देण्याची तरतूदही प्रस्तावात करण्यात आली आहे. संबंधित आर्थिक वर्षात किमान १८० दिवस प्रत्यक्ष काम केलेल्या पात्र कर्मचाऱ्यांना हजेरीच्या प्रमाणात अनुदान देण्यात येणार आहे. कामावर असताना झालेल्या अपघातामुळे घ्यावी लागलेली विशेष वैद्यकीय रजाही हजेरीसाठी ग्राह्य धरली जाणार आहे. प्राथमिक शिक्षण विभागातील शिक्षण सेवकांना वेतनाच्या ८.३३ टक्के रकमेसह दहा हजार रुपये अतिरिक्त अनुदान मिळणार आहे. या निर्णयांच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक निधीची तरतूद करण्यात येणार आहे. अंदाजपत्रकातील तरतूद अपुरी पडल्यास अन्य लेखाशीर्षांमधून निधी वर्ग करण्याचे अधिकार आयुक्तांना देण्याची तरतूद प्रस्तावात आहे. स्थायी समितीच्या मान्यतेनंतर मुख्य सभा मान्य करेल या भरवशावर पुढील आवश्यक प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करण्यात येणार आहे.



पुणे विमानतळाकडे जाणाऱ्या रस्त्यांच्या रुंदीकरणास गती देण्याचे महापालिका आयुक्तांचे निर्देश

विमाननगर, सिम्बायोसिस रोड, नागपूर चाळ ते ५०९ चौक तसेच नॉर्थ मेन रोड परिसरातील कामांची आयुक्तांकडून पाहणी



पुणे : पुणे शहरातील वाहतूक व्यवस्था अधिक सुरळीत करण्यासाठी तसेच पुणे विमानतळाकडे जाणाऱ्या रस्त्यांची क्षमता वाढविण्याच्या दृष्टीने मा. पुणे महापालिका आयुक्त श्री.नवल किशोर राम यांनी नुकतेच विविध रस्त्यांची प्रत्यक्ष जागेवर जाऊन पाहणी केली. यावेळी संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांना रस्त्यांचे रुंदीकरण, अतिक्रमण निर्मूलन, भूसंपादन आणि सुरू असलेली विकासकामे वेळेत पूर्ण करण्याबाबत आवश्यक निर्देश दिले.

विमाननगर परिसरातील व्हीव्हीआयपी रोड, सिम्बायोसिस रोड आणि शुभ चौक येथील हातगाड्या, फेरीवाले तसेच साइड मार्जिनमधील अतिक्रमणांची आयुक्तांनी पाहणी केली. या परिसरातील अतिक्रमणांमुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होऊ नये, यासाठी निश्चित पॉइंट ठरवून नियमितपणे अतिक्रमण निर्मूलनाची कारवाई करण्याचे निर्देश संबंधित विभागांना देण्यात आले.

रामवाडी मुंजारी मार्ग ते पुणे विमानतळाकडे जाणाऱ्या सिम्बायोसिस रोडची पाहणी करण्यात आली. मंजूर विकास आराखड्यानुसार (डीपी) या रस्त्याचे ३० मीटर रुंदीकरण करण्याबाबत आयुक्तांनी संबंधित अधिकाऱ्यांना निर्देश दिले.

नागपूर चाळ, जेल रोड पोलीस चौकी ते ५०९ चौक आणि विकफिल्ड चौक मार्गे पुणे विमानतळाकडे जाणाऱ्या रस्त्याच्या रुंदीकरणाच्या कामाची पाहणी करण्यात आली. तसेच ५०९ चौक येथून हवाई दलाच्या हद्दीतून धानोरी मुख्य रस्त्याकडे जाणाऱ्या रस्त्याबाबत चर्चा करण्यात आली. या कामाला गती देण्यासाठी एअर फोर्स स्टेशन, लोहगाव येथील अधिकाऱ्यांसोबत बैठक आयोजित करण्याचे निर्देश आयुक्तांनी दिले.

नॉर्थ मेन रोड येथे सुरू असलेल्या रस्त्याच्या कामाची पाहणी करून हे काम लवकरात लवकर पूर्ण करण्याचे निर्देश महापालिका आयुक्तांनी पथ विभागाच्या अधिकाऱ्यांना दिले.

पुणे विमानतळ परिसरातील एरो मॉलजवळ कलम २०५ अंतर्गत आखण्यात आलेल्या ३० मीटर रुंदीच्या रस्त्याच्या भूसंपादनाची कार्यवाही तातडीने पूर्ण करण्याचे आदेश आयुक्तांनी संबंधित विभागांना दिले.

पुणे विमानतळाकडे जाणाऱ्या प्रमुख रस्त्यांचे रुंदीकरण, अतिक्रमण निर्मूलन आणि प्रलंबित विकासकामांना गती देऊन शहरातील वाहतूक अधिक सुरळीत करण्यासाठी महापालिका प्रशासनाने समन्वयाने कार्यवाही करावी, असे निर्देश या पाहणीदरम्यान देण्यात आले.

या पाहणीवेळी मा.अतिरिक्त महापालिका आयुक्त श्री.प्रजित नायर, मा.अतिरिक्त महापालिका आयुक्त श्री.ओमप्रकाश दिवटे, मा.अतिरिक्त पोलीस आयुक्त, श्री.मनोज पाटील, मा. उपायुक्त श्री.तुषार बाबर, मा.मुख्य अभियंता (पथ विभाग) श्री.राजेश बनकर, मा.उपायुक्त, अतिक्रमण विभाग श्री. सोमनाथ बनकर, मा.महापालिका सहाय्यक आयुक्त श्री.संजय पोळ, तसेच पथ विभाग, बांधकाम विकास विभाग आणि नगर रोड-वाघोली क्षेत्रीय कार्यालयातील अधिकारी उपस्थित होते.

पुणे महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या वतीने फटाके मुक्त, स्वच्छता व पर्यावरण पूरक दिवाळी जनजागृती अभियान



पुणे : स्वच्छ भारत अभियान, स्वच्छ सर्वेक्षण - २०२६ अन्वये घनकचरा व्यवस्थापन, कमिन्स इंडिया लि. ,रोटरी क्लब ऑफ पुणे सहवास, स्वच्छ व जनवानी सहकारी संस्था, कोथरूड व्यापारी संघ, ज्येष्ठ नागरिक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने प्रभाग क्रमांक ३१, डहाणूकर कॉलनी सर्कल व कोथरूड गावठाण परिसरामध्ये दिवाळीचा सण हा फटाके मुक्त, स्वच्छता व पर्यावरण पूरक साजरा करण्यासाठी नागरिकांमध्ये जनजागृती पर उपक्रम राबवण्यात आला. सदर उपक्रमाद्वारे नागरिकांना स्वच्छते विषयी ओला व सुका कचरा वर्गीकरण करणे, प्लास्टिकचा वापर टाळणे, कागदी व कापडी पिशव्यांचा वापर करणे, पाण्याचा अपव्यय टाळून वापर कमी करणे, दिवाळीच्या सणामध्ये फटाके वाजवू नये, कर्णबधिर होणाऱ्या फटाक्यांचा वापर टाळणे, सार्वजनिक ठिकाणी पान, तंबाखू, गोवा, गुटखा खाऊन थुंकू नये, मोठ्या प्रमाणात फटाके वाजवून सार्वजनिक रस्ते अस्वच्छ करू नये, हात गाडीवाले, पथारी वाले, भाजी व फळ विक्रेते, स्नॅक सेंटर, चहा, हारफूल, पान विक्रेते तसेच सर्व प्रकारच्या व्यवसायिकांनी आपल्या दुकाना समोर कचरा वर्गीकरणाचे डब्बे ठेवावे अशा सुचनाही देण्यात आल्या.

प्लास्टिक पिशवीला ना म्हणा, कागदी पिशवीला हा म्हणा, कचरा करुनी कमी, आरोग्याची मिळेल हमी, परिसराची करू सफाई होईल आरोग्याची कमाई, स्वच्छता पाळा रोगराई टाळा, प्रदूषण मुक्त दिवाळी निरोगी आपण,निरोगी निसर्ग, निसर्गाची काळजी हेच खरे दिवाळीची गिफ्ट,आवाज नाही प्रदूषण नाही आनंद मात्र दुप्पट, माझ्या आरोग्यासाठी फटाके नाही, फटाके नाही दिवे लावा हसरे चेहरे आणि आनंद वाटा, चला मानवी साखळी बनवूया फटाके मुक्तीचा संदेश घरोघरी पोहोंचवू या, फटाके टाळा, कचरा कमी करा, निसर्ग वाचवा, आरोग्य जपा, प्रदूषण टाळा निसर्ग वाचवा मानवी आरोग्य वाचवा, निसर्गाचा करू नका ऱ्हास अन्यथा होईल मानवी जीवन मकास अशा प्रकारच्या घोषणा देऊन नागरिकांना फटाके मुक्त स्वच्छता व पर्यावरण पूरक सण साजरा करण्याचे संदेश देण्यात आले. सदर परिसरामध्ये स्वच्छता करून रांगोळी व मानवी साखळी तसेच प्रचार फेरीच्या माध्यमातून जनजागृती अभियान राबविण्यात आले.

या मोहिमेमध्ये महापालिका सहाय्यक आयुक्त सुहास जाधव, वरिष्ठ आरोग्य निरीक्षक राम सोनवणे, आरोग्य निरीक्षक करण कुंभार, किरण जाधव, राजेश आहेर, दत्तात्रय दळवी, गणेश साठे, गणेश चौधरी, श्रीमती जया सांगडे, मोकादम वैजीनाथ गायकवाड, आण्णा ढावरे, कमिन्सचे संपत खैरे, रोटरीचे किरण इंगळे, जनवानीचे समीर अजगेकर, जयश्री पाटील, स्वच्छ संस्थेचे शिवाजी सकट, व्यापारी संघाचे शशिकांत उभे, सुभाष निंबाळकर व इतर सर्व नागरिक शिवाय स्वच्छता सेवक सहभागी झाले.

राज्यस्तरीय आदर्श महाराष्ट्र गौरव पुरस्काराने कॉ.वैजीनाथ गायकवाड सन्मानित!



पुणे : पुणे महानगरपालिका कामगार युनियन (मान्यताप्राप्त) चे संयुक्त सचिव व कोथरूड बावधन क्षेत्रीय कार्यालयाचे स्वच्छतेचे ब्रँड अँबेसिडर व पुणे महानगरपालिकेच्या सार्वजनिक स्वच्छता विभागातील विशेषता कोथरूड उपनगरामध्ये स्वच्छते विषयीचे विविध उपक्रम व जनजागृती मध्ये कार्यतत्पर, कर्तव्यनिष्ठ मोकादम वैजीनाथ गायकवाड यांना स्वच्छते विषयी जनजागृतीपर विविध उपक्रम व कामगार चळवळीतील सामाजिक कार्यातील योगदान या विषयी त्यांच्या अंगी असलेल्या जिद्द, चिकाटी आणि कार्यरत असलेल्या कामगार चळवळीतील व त्यांच्या सामाजिक व स्वच्छतेच्या क्षेत्रात अमूल्य योगदानामुळे समाजात एक आदर्श निर्माण झाला आहे. तसेच वैजीनाथ गायकवाड यांनी यापूर्वी पुणे महानगरपालिकेचा गुणवंत कामगार पुरस्कार, स्वच्छ भारत अभियान, स्वच्छ सर्वेक्षण मध्ये दोन वेळा स्वच्छ पुरस्कार, स्वच्छता मित्र पुरस्कार, कर्तव्यनिष्ठ पुरस्कार, कर्तव्य तत्पर कामगार कार्यकर्ता पुरस्कार या त्यांच्या विविध पुरस्कृत कार्याची दखल घेऊन राष्ट्रभक्ती परिवार युनायटेड सिटीझन्स अँड वेल्फेअर कौन्सिल, भारत ग्रेट पीपल सोशल फाउंडेशन विजेता मीडिया यांच्यावतीने दि.३१/१०/२०२६ रोजी भारत इतिहास संशोधन मंडळ, राजवाडे हॉल, सदाशिव पेठ येथील सभागृहात एमआयटी ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटचे संचालक डॉ. महेश थोरवे, युनायटेड सिटीजन अँड वेल्फेअर कौन्सिलच्या राष्ट्रीय अध्यक्षा भारतीताई तुपे यांच्या हस्ते राज्यस्तरीय आदर्श महाराष्ट्र गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. सन्मान चिन्ह, ट्रॉफी, मेडल, विशेष सन्मानपत्र व तिरंगा ध्वज असे पुरस्काराचे स्वरूप होते.

पुरस्कार वितरण प्रसंगी डॉ. महेश थोरवे व कार्यक्रमाच्या अध्यक्षा भारती तुपे यांनी पुरस्काराने सन्मानित झालेल्या पुरस्कारार्थीने आप आपल्या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करून भारतीय समाजाला नवी दिशा देऊन आदर्श देश व नागरिक घडवून भारत मातेची सेवा करावी असे आवाहन करण्यात आले.

सत्यनिष्ठेतून समृद्धीकडे : भ्रष्टाचारमुक्त समाजाची गरज – डॉ. राजेंद्र बगाटे

समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी आर्थिक संपन्नतेइतकीच नैतिक संपन्नताही महत्त्वाची असते. एखाद्या देशाकडे आधुनिक तंत्रज्ञान, भक्कम पायाभूत सुविधा, उद्योगधंदे, नैसर्गिक साधनसंपत्ती आणि कुशल मनुष्यबळ असले, तरी सार्वजनिक जीवनात प्रामाणिकपणा नसेल, प्रशासनात पारदर्शकता नसेल आणि निर्णयप्रक्रियेत न्याय्यतेचा अभाव असेल, तर त्या देशाची प्रगती सर्वसमावेशक होऊ शकत नाही. भ्रष्टाचार हा केवळ आर्थिक गैरव्यवहार नसून तो समाजातील विश्वास, समान संधी, न्याय आणि लोकशाही मूल्यांना बाधा पोहोचवणारा गंभीर प्रश्न आहे. सार्वजनिक पदावरील व्यक्तीने आपल्या अधिकारांचा वापर वैयक्तिक लाभासाठी करणे, नागरिकांच्या हक्कांमध्ये अडथळे निर्माण करणे किंवा सार्वजनिक निधीचा गैरवापर करणे, यामुळे संपूर्ण व्यवस्थेची विश्वासार्हता कमी होते. म्हणूनच सत्यनिष्ठा, सचोटी, पारदर्शकता आणि उत्तरदायित्व ही मूल्ये केवळ शासनव्यवस्थेतच नव्हे, तर समाजाच्या प्रत्येक स्तरावर रुजणे आवश्यक आहे.

या पार्श्वभूमीवर भारतात दरवर्षी साजरा केला जाणारा दक्षता जनजागृती सप्ताह विशेष महत्त्व प्राप्त करतो. केंद्रीय दक्षता आयोगाच्या मार्गदर्शनाखाली २०२६ मध्ये हा सप्ताह २६ ऑक्टोबर ते १ नोव्हेंबर या कालावधीत देशभर साजरा केला जात आहे. यंदाची संकल्पना 'सत्यनिष्ठेतून समृद्धी' अशी आहे. या संकल्पनेतून प्रामाणिक आचरण, नैतिक मूल्ये आणि पारदर्शक प्रशासन यांच्या आधारे देशाची शाश्वत समृद्धी साधण्याचा संदेश दिला आहे. हा सप्ताह केवळ सरकारी कार्यालयांमध्ये शपथ घेणे, व्याख्याने आयोजित करणे किंवा जनजागृतीचे फलक लावणे एवढ्यापुरता मर्यादित राहता कामा नये. सार्वजनिक जीवनातील प्रत्येक घटकाने स्वतःच्या वर्तनाचे परीक्षण करून भ्रष्टाचाराला नकार देण्याची आणि प्रामाणिकपणाला स्वीकारण्याची ही संधी मानली पाहिजे.

दक्षता जनजागृती सप्ताहाचा संबंध सार्वजनिक प्रशासनातील सचोटी आणि भ्रष्टाचार प्रतिबंधाच्या प्रयत्नांशी आहे. केंद्रीय दक्षता आयोगाची स्थापना १९६४ मध्ये करण्यात आली. पुढे केंद्रीय दक्षता आयोग अधिनियम, २००३ द्वारे आयोगाला वैधानिक दर्जा प्राप्त झाला. केंद्र सरकारच्या मंत्रालयांमध्ये, विभागांमध्ये आणि सार्वजनिक क्षेत्रातील संस्थांमध्ये दक्षता प्रशासन अधिक प्रभावी करण्यासाठी आयोग मार्गदर्शन करतो. भ्रष्टाचारासंबंधी तक्रारींची दखल घेणे, दक्षता यंत्रणांच्या कार्याला दिशा देणे, प्रतिबंधात्मक उपाय सुचविणे आणि सार्वजनिक सेवांमध्ये नैतिक आचरणाला प्रोत्साहन देणे ही त्याच्या कार्याची महत्त्वाची क्षेत्रे आहेत. दरवर्षी ३१ ऑक्टोबर रोजी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीच्या आठवडाभरात हा सप्ताह साजरा केला जातो. सार्वजनिक जीवनातील सचोटी आणि कर्तव्यनिष्ठेचे महत्त्व अधोरेखित करणे हा या आयोजनामागील व्यापक हेतू आहे.

भ्रष्टाचाराची व्याप्ती केवळ लाच घेणे किंवा देणे एवढी मर्यादित नाही. सार्वजनिक अधिकारांचा गैरवापर करून अनुचित लाभ मिळविणे, सरकारी निधीचा अपहार करणे, निविदा प्रक्रियेत संगनमत करणे, बनावट कागदपत्रांच्या आधारे शासकीय लाभ मिळविणे, पात्र व्यक्तींना डावलून अपात्र व्यक्तींना लाभ देणे, पदाचा प्रभाव वापरून नियमबाह्य निर्णय घेणे किंवा सार्वजनिक मालमत्तेचा वैयक्तिक कारणांसाठी वापर करणे, हीदेखील भ्रष्टाचाराची विविध रूपे आहेत. काही गैरप्रकार उघडपणे घडतात, तर काही प्रशासकीय प्रक्रियेतील गुंतागुंत, निर्णयांमधील पक्षपात आणि नियमांच्या संदिग्धतेमुळे घडतात. अनेकदा भ्रष्टाचाराला समाजातील काही घटकांकडून मूक संमती मिळते. 'काम लवकर व्हावे म्हणून पैसे द्यावे लागतात', 'ओळख असल्याशिवाय काम होत नाही' किंवा 'नियमांपेक्षा व्यवहार महत्त्वाचा' अशी मानसिकता भ्रष्टाचाराला खतपाणी घालते. ही मानसिकता बदलल्याशिवाय भ्रष्टाचारमुक्त समाजाची निर्मिती होणे कठीण आहे.

भ्रष्टाचाराचे परिणाम सर्व समाजघटकांना जाणवतात; मात्र त्याचा सर्वाधिक फटका गरीब, वंचित, ग्रामीण आणि दुर्बल घटकांना बसतो. शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळविण्यासाठी नागरिकांना अनावश्यक अडथळ्यांचा सामना करावा लागला, तर योजनांचा मूळ उद्देशच निष्फळ ठरतो. रेशन, घरकुल, शिष्यवृत्ती, रोजगार हमी, आरोग्यसेवा, सामाजिक सुरक्षा आणि शैक्षणिक प्रवेश यांसारख्या मूलभूत सुविधांसाठी नागरिकांना वारंवार कार्यालयात जावे लागणे, कागदपत्रांच्या नावाखाली अडवणूक होणे किंवा अनधिकृत पैसे मागितले जाणे ही गंभीर बाब आहे. ज्या व्यक्तीला शासनाकडून मदत मिळणे अपेक्षित आहे, तिलाच आपला हक्क मिळविण्यासाठी अतिरिक्त आर्थिक आणि मानसिक त्रास सहन करावा लागत असेल, तर ते सुशासनाचे लक्षण नाही. भ्रष्टाचारामुळे सार्वजनिक सेवांचा खर्च वाढतो, विकासकामांची गुणवत्ता कमी होते आणि समाजातील विषमता अधिक तीव्र होते.

महाराष्ट्राच्या संदर्भात भ्रष्टाचारविरोधी जागरूकतेची गरज अधिक व्यापक आहे. राज्यातील शहरी आणि ग्रामीण भागात विविध शासकीय विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था, महामंडळे आणि सार्वजनिक संस्था नागरिकांना सेवा पुरवितात. ग्रामपंचायतीपासून महानगरपालिकेपर्यंत पाणीपुरवठा, रस्ते, स्वच्छता, आरोग्य, शिक्षण, सिंचन, घरकुल आणि रोजगार यांसारख्या क्षेत्रांत मोठ्या प्रमाणावर सार्वजनिक निधी खर्च होतो. या निधीचा योग्य वापर झाला, तर नागरिकांच्या जीवनमानात सुधारणा होऊ शकते. परंतु कामे कागदावर पूर्ण दाखविणे, निकृष्ट दर्जाचे बांधकाम करणे, लाभार्थी निवडीत पक्षपात करणे किंवा मंजूर निधीचा गैरवापर करणे यामुळे विकासाच्या संधी हिरावल्या जातात. विशेषतः दुष्काळी आणि ग्रामीण भागात पाणीपुरवठा, जलसंधारण, शेतीसंबंधित योजना आणि रोजगाराच्या कामांमध्ये पारदर्शकता असणे अत्यावश्यक आहे. सार्वजनिक निधीचा अपव्यय म्हणजे नागरिकांच्या विकासाच्या हक्कावरच घाला होय.

स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये नागरिकांचा सहभाग वाढविणे हा भ्रष्टाचार प्रतिबंधाचा प्रभावी मार्ग आहे. ग्रामसभा ही ग्रामीण लोकशाहीची महत्त्वाची संस्था असून गावाच्या विकासाशी संबंधित निर्णयांमध्ये नागरिकांना सहभागी होण्याची संधी देते. ग्रामसभेत विकासकामांचे नियोजन, निधीचा वापर, लाभार्थी निवड, कामांची गुणवत्ता आणि योजनांच्या अंमलबजावणीबाबत चर्चा झाली पाहिजे. ग्रामपंचायतीने मंजूर कामांची माहिती, खर्चाचा तपशील आणि कामांची सद्यस्थिती नागरिकांसाठी उपलब्ध करून दिली पाहिजे. महिला मंडळे, शेतकरी सामाजिक सार्वजनिक ठेवावे. लेखापरीक्षणाच योजनांची अंमलबजावणी कागदोपत्री तुलना करता लोकप्रतिनिधींन प्रश्नांक



डॉ.राजेंद्र बगाटे, (लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)
ईमेल – bagate.rajendra5gmail.com

बचतगट, युवक गट आणि संस्थांनीही कामांवर लक्ष सामाजिक या माध्यमातून प्रत्यक्ष आणि नोंदी यांची ये ते. ी नागरिकांच्या डे विरोध म्हणून न पाहता लोकशाह ीतील उत्तरदायित्वाचा भाग म्हणून पाहिले पाहिजे.

दक्षता म्हणजे गैरव्यवहार घडल्यानंतर चौकशी करणे एवढेच नव्हे, तर गैरव्यवहार घडण्याची शक्यता निर्माण करणाऱ्या त्रुटी आधीच दूर करणे होय. यालाच प्रतिबंधात्मक दक्षता म्हणतात. प्रशासनातील अनावश्यक प्रक्रिया, अस्पष्ट नियम, कामकाजातील विलंब, अधिकारांचा अवाजवी वापर आणि निर्णयप्रक्रियेतील अपारदर्शकता यांमुळे भ्रष्टाचाराला संधी मिळते. नागरिकांना एखादे काम करण्यासाठी कोणती कागदपत्रे आवश्यक आहेत, किती शुल्क भरावे लागेल, किती दिवसांत काम पूर्ण होईल आणि विलंब झाल्यास तक्रार कुठे करावी, याची स्पष्ट माहिती मिळाली पाहिजे. कार्यालयीन कामकाजात जबाबदारी निश्चित करणे, सेवा देण्यासाठी कालमर्यादा ठरविणे, तक्रारींचा नियमित आढावा घेणे आणि कामकाजाचे लेखापरीक्षण करणे आवश्यक आहे. भ्रष्टाचार होऊ नये अशी व्यवस्था निर्माण करणे हे भ्रष्टाचार झाल्यानंतर कारवाई करण्याइतकेच महत्त्वाचे आहे.

चंदाच्या सप्ताहाच्या अनुषंगाने केंद्रीय दक्षता आयोगाने १७ ऑगस्ट ते १६ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत तीन महिन्यांची प्रतिबंधात्मक दक्षता मोहीम राबविण्याचे निर्देश दिले आहेत. या मोहिमेत प्रलंबित तक्रारींचा निपटारा, प्रलंबित प्रकरणांचा निपटारा, अधिकारी व कर्मचाऱ्यांची क्षमता वृद्धी, डिजिटल उपक्रम आणि कंत्राट व्यवस्थापन या पाच क्षेत्रांवर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. क्षमता वृद्धीच्या अंतर्गत माहिती तंत्रज्ञान व सायबर सुरक्षितता, सार्वजनिक खरेदी, सरकारी ई-बाजारपेठेतील नव्या सुविधा, आचरणविषयक नियम आणि हितसंबंधांचा संघर्ष यांसारख्या विषयांवर प्रशिक्षण देण्याचे महत्त्व अधोरेखित झाले आहे. या मोहिमेचा उद्देश केवळ तक्रारींची संख्या कमी करणे नसून दक्षता प्रशासनाची कार्यक्षमता वाढविणे हा आहे. तक्रारींचा वेळेत निपटारा झाल्यास नागरिकांचा विश्वास वाढतो, तर अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना योग्य प्रशिक्षण मिळाल्यास नियमबद्ध व जबाबदार निर्णयप्रक्रिया विकसित होते.

माहिती तंत्रज्ञानामुळे भ्रष्टाचार प्रतिबंधासाठी अनेक नवीन संधी निर्माण झाल्या आहेत. शासकीय सेवांचे संगणकीकरण, ऑनलाइन अर्जप्रक्रिया, ई-निविदा, डिजिटल देयके, थेट लाभ हस्तांतरण आणि ऑनलाइन तक्रार निवारण यांमुळे नागरिकांचा कार्यालयीन फेऱ्यांवरील अवलंब कमी होऊ शकतो. शासकीय खरेदीसाठी ई-खरेदी व्यवस्था आणि सरकारी ई-बाजारपेठ यांचा वापर केल्यास खरेदी प्रक्रियेत पारदर्शकता वाढविण्यास मदत होते. डिजिटल नोंदींमुळे व्यवहारांचा मागोवा घेता येतो आणि निर्णयप्रक्रियेतील अनियमितता शोधणे सोपे होते. तथापि, तंत्रज्ञान हा भ्रष्टाचाराचा आपोआप नाश करणारा उपाय नाही. डिजिटल व्यवस्थेतही बनावट नोंदी, संगनमत, माहितीचा गैरवापर आणि सायबर गुन्हे घडू शकतात. म्हणूनच माहितीची सुरक्षितता, नियमित तांत्रिक तपासणी, नागरिकांना डिजिटल साक्षरता आणि प्रणालींचे उत्तरदायित्व यांकडे लक्ष देणे आवश्यक आहे. सार्वजनिक कंत्राटे आणि खरेदी प्रक्रियेत पारदर्शकता राखणे हेही दक्षता प्रशासनाचे महत्त्वाचे क्षेत्र आहे. रस्ते, पूल, शाळा, रुग्णालये, पाणीपुरवठा योजना आणि इतर सार्वजनिक कामांसाठी मोठ्या प्रमाणावर निधी खर्च केला जातो. निविदेच्या अटी विशिष्ट कंत्राटदाराच्या फायद्यासाठी तयार करणे, स्पर्धा मर्यादित करणे, संगनमताने दर निश्चित करणे, प्रत्यक्ष कामापेक्षा अधिक खर्च दाखविणे किंवा निकृष्ट दर्जाचे काम स्वीकारणे यामुळे सार्वजनिक पैशाचे नुकसान होते. कंत्राट प्रक्रियेतील प्रत्येक टप्पा नियमबद्ध आणि तपासण्यायोग्य असला पाहिजे. कामाची गुणवत्ता स्वतंत्रपणे तपासली पाहिजे. काम पूर्ण झाल्यानंतर कागदोपत्री प्रमाणपत्राबरोबरच प्रत्यक्ष पडताळणी झाली पाहिजे. कंत्राटदार, अधिकारी आणि लोकप्रतिनिधी यांनी सार्वजनिक निधी हा जनतेच्या मालकीचा आहे, याची जाणीव ठेवणे आवश्यक आहे.

भ्रष्टाचारविरोधी लढ्यात माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ हा नागरिकांसाठी प्रभावी साधन आहे. या कायद्यामुळे नागरिकांना सार्वजनिक प्राधिकरणांकडून माहिती मागण्याचा अधिकार मिळाला आहे. शासकीय निर्णय, निधीचा वापर, विकासकामे, निविदा, लाभार्थी निवड आणि प्रशासकीय कार्यवाही यांसंबंधी माहिती मिळवून नागरिक व्यवस्थेचे परीक्षण करू शकतात. माहितीचा अधिकार हा केवळ कागदपत्रे मिळविण्याचा मार्ग नसून प्रशासनाला उत्तरदायी बनविण्याचे लोकशाही साधन आहे. मात्र, प्रत्येक माहिती मिळविण्यासाठी नागरिकांना स्वतंत्र अर्ज करावा लागू नये. शासकीय कार्यालयांनी महत्त्वाची माहिती नियमितपणे स्वतःहून प्रसिद्ध केली पाहिजे. निर्णयांची कारणे स्पष्ट असावीत आणि तक्रार निवारणाची व्यवस्था सहज उपलब्ध असावी. माहितीचा अधिकार वापरताना नागरिकांनी तथ्याधारित प्रश्न विचारणे आणि सार्वजनिक हिताला प्राधान्य देणेही महत्त्वाचे आहे.

भ्रष्टाचार उघड करणाऱ्या व्यक्तींचे संरक्षण करणे ही लोकशाही व्यवस्थेची महत्त्वाची जबाबदारी आहे. अनेक वेळा गैरव्यवहाराची माहिती असलेल्या व्यक्तींना तक्रार केल्यास बदली, दबाव, छळ किंवा अन्य प्रतिकूल परिणामांना सामोरे जावे लागेल, अशी भीती वाटते. त्यामुळे तक्रारदारांची ओळख आणि सुरक्षितता जपणे, तक्रारींची निष्पक्ष चौकशी करणे आणि सूडबुद्धीने होणाऱ्या कारवाईपासून संरक्षण देणे आवश्यक आहे. केंद्र शासनाशी संबंधित आणि केंद्रीय दक्षता आयोगाच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या प्रकरणांसाठी आयोगाच्या निर्धारित प्रक्रियेचा उपयोग करता येतो. राज्य शासनाशी संबंधित प्रकरणांसाठी राज्यातील सक्षम दक्षता यंत्रणा किंवा लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार करता येते. तक्रार करताना पुरावे, कागदपत्रे आणि घटनांचा तपशील अचूक देणे आवश्यक आहे. वैयक्तिक वैरातून केलेले आरोप किंवा अप्रमाणित माहिती प्रसारित करणे टाळले पाहिजे.

भ्रष्टाचार रोखण्याची जबाबदारी केवळ शासन आणि प्रशासनाची नाही. नागरिकांच्या दैनंदिन वर्तनातूनही प्रामाणिक सार्वजनिक संस्कृती निर्माण होते. स्वतःचे काम लवकर व्हावे म्हणून नियमबाह्य मार्ग स्वीकारणे, ओळखीचा वापर करून अनुचित लाभ मिळविणे, पात्रता नसतानाही शासकीय योजनेचा लाभ घेण्याचा प्रयत्न करणे किंवा लाच (पान ९ वर)

संपादकीय...

कुंभमेळ्यासाठी करोडोंची उधळपट्टी की दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना मदतीचा हात? महाराष्ट्राने आत्मपरीक्षण करण्याची वेळ आली आहे!

धर्म महत्त्वाचा आहे, श्रद्धा महत्त्वाची आहे; पण तहानलेल्या माणसाला पाणी, उपाशी माणसाला अन्न आणि संकटात सापडलेल्या शेतकऱ्याला मदत मिळणे यापेक्षा मोठे जनहित कोणते असू शकते?

महाराष्ट्रात कुंभमेळ्याच्या निमित्ताने कोटयवधी रुपयांची विकासकामे सुरू आहेत. धार्मिक कार्यक्रमाच्या आयोजनाला विरोध करण्याचा कोणताही हेतू नाही. कुंभमेळा हा लाखो भाविकांच्या श्रद्धेचा विषय आहे. नुकतेच राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या साक्षने धर्मध्वजारोहनाव्दारे कुंभ पर्वाची मुहूर्त मेढ करण्यात आली. या कार्यक्रमास राज्यपाल जिष्णू देव वर्मा, मुख्यमंती देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सुनेत्रा पवार, कुंभमेळा मंत्री गिरीष महाजन, मंत्री छगन भूजबळ, दादा भुसे, जयकुमार रावल, अशोक वुईके, नितेश राणे, नाशिकच्या महापौर हिमगौरी आडके तसेच जगदगुरू श्रीमद् स्वामी नरेंद्रचार्याजी महाराज आदी मान्यवर उपस्थित होते.देशभरातून भाविक येतात, धार्मिक परंपरा जपल्या जातात आणि पर्यटनालाही चालना मिळते. मात्र प्रश्न धार्मिक श्रद्धेचा नसून सरकारच्या प्राधान्यक्रमाचा आहे.

एकीकडे धार्मिक कार्यक्रमासाठी कोटयवधी रुपयांची कामे, रस्ते, सुशोभीकरण आणि इतर सुविधांवर खर्च केला जात असताना दुसरीकडे दुष्काळ, पाणीटंचाई, शेतीचे नुकसान आणि आर्थिक संकटाचा सामना करणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रश्न आपण विसरत आहोत का?

सरकारने धार्मिक कार्यक्रमासाठी खर्च करू नये, असे म्हणणे चुकीचे ठरेल. परंतु धार्मिक आयोजन आणि जनतेच्या मूलभूत गरजा यांच्यात योग्य समतोल राखणे ही सरकारची घटनात्मक आणि नैतिक जबाबदारी आहे.

सरकारने १३ मार्च २०२६ रोजी झालेल्या शिखर समितीच्या बैठकीत नाशिक-त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी तब्बल २२,४२५.३९ कोटी रुपयांचा विकास आराखडा मंजूर केला आहे. यामध्ये रस्ते, पूल, पाणीपुरवठा, घाट, सुरक्षा, स्वच्छता आणि इतर पायाभूत सुविधांचा समावेश आहे. काही माध्यमांच्या अहवालानुसार विविध संबंधित प्रकल्पांचा एकूण आकडा ३४ हजार कोटी रुपयांपेक्षाही अधिक आहे.

२६ सप्टेंबर २०२६ रोजी महाराष्ट्र सरकारने राज्यातील ३५८ पैकी २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळी परिस्थिती घोषित केली. म्हणजे जवळपास ७४ टक्के तालुके दुष्काळाच्या विळख्यात आले. जून ते सप्टेंबर या काळात राज्यात सरासरीपेक्षा १८ टक्के कमी पाऊस झाला, तर मराठवाड्यातील पावसाची तूट ३८ टक्क्यांपर्यंत पोहोचली होती.ही केवळ आकडेवारी नाही. या आकड्यांच्या मागे हजारो शेतकऱ्यांचे उद्धस्त झालेले संसार आहेत.

ज्या शेतकऱ्याने कर्ज काढून बियाणे आणले, खत विकत घेतले, शेतात मेहनत केली, त्याच्या हातात पीक येण्याऐवजी नुकसान आले. विहिरींनी तळ गाठला, जनावरांसाठी चारा मिळणे कठीण झाले, पिण्याच्या पाण्यासाठी महिलांना वणवण करावी लागते. शेतमजुरांच्या हाताला काम नाही. गावातील अर्थव्यवस्थाच अडचणीत आली आहे.

अशा परिस्थितीत सरकारने स्वतःला एक प्रश्न विचारला पाहिजे की, राज्याच्या तिजोरीतील पैसा खर्च करण्याचे प्राधान्य नेमके काय असायला हवे?

आज आपण छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव अभिमानाने घेतो. त्यांच्या पराक्रमाचे पोवाडे गातो. त्यांच्या नावाने राजकारणही करतो. पण त्यांच्या विचारांचा खरा अर्थ समजून घेण्याची वेळ आली आहे.

शिवाजी महाराजांचे स्वराज्य हे केवळ किल्ले जिंकण्यासाठी नव्हते. ते रयतेच्या संरक्षणासाठी होते. शेतकरी हा राज्याच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे, याची जाणीव त्यांच्या राज्यकारभारात दिसून येते. शेतकऱ्यांचे नुकसान झाले तर त्यांना सावरणे, शेतीला प्रोत्साहन देणे आणि सामान्य जनतेचे हित जपणे ही राज्यकर्त्यांची जबाबदारी होती. आज शिवाजी महाराज असते तर त्यांनी सर्वप्रथम कोणत्या प्रश्नाला प्राधान्य दिले असते? दुष्काळाने होरपळणाऱ्या रयतेला की कार्यक्रमाच्या भव्यतेला?

हा प्रश्न कोणत्याही धार्मिक भावनेच्या विरोधात नाही. उलट धर्म आणि संस्कृती आपल्याला माणुसकी शिकवत असतील, तर संकटात असलेल्या माणसाच्या मदतीला धावून जाणे हीच खरी शिवभक्ती आहे.

महात्मा ज्योतिराव फुले यांनी शेतकरी आणि कष्टकरी वर्गाच्या शोषणाविरुद्ध आवाज उठवला. राजर्षी शाहू महाराजांनी बहुजनांच्या शिक्षणासाठी आणि सामाजिक न्यायासाठी काम केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समाजातील वंचित माणसाला समान हक्क मिळवून देण्यासाठी आयुष्यभर संघर्ष केला.

या महापुरुषांच्या विचारांतून एकच संदेश मिळतो : सत्तेचा उपयोग सामान्य माणसाचे जीवन उंचावण्यासाठी झाला पाहिजे.

संत तुकाराम महाराज, संत ज्ञानेश्वर महाराज, संत गाडगेबाबा यांनी समाजाला माणुसकी, समता, सेवा आणि परोपकाराची शिकवण दिली.

संत गाडगेबाबांनी स्वतः हातात झाडू घेऊन स्वच्छतेचा संदेश दिला. त्यांनी मंदिरांपेक्षा माणसाची सेवा मोठी मानली. भुकेल्याला अन्न, तहानलेल्याला पाणी आणि गरजूला मदत करणे हा त्यांच्या कार्याचा गाभा होता.

मग आज आपण संतांच्या नावाने मोठे धार्मिक कार्यक्रम आयोजित करत असताना त्यांच्या विचारांचे पालन करत आहोत का?

एका बाजूला देवाच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांसाठी उत्तम रस्ते, पाणी, स्वच्छता आणि निवासाची व्यवस्था केली जाते, हे निश्चितच आवश्यक आहे. पण दुसऱ्या बाजूला त्याच राज्यातील गावांमध्ये नागरिकांना पिण्याचे पाणी मिळत नसेल, शेतकऱ्यांना पिकाच्या नुकसानीची भरपाई मिळत नसेल, तर आपल्या विकासाच्या संकल्पनेत काहीतरी कमी आहे, हे मान्य करावे लागेल. आज राजकीय पक्ष धार्मिक कार्यक्रमांच्या भव्यतेचे श्रेय घेण्यासाठी पुढे येतात. मोठमोठे मंच, जाहिराती, प्रसिद्धी आणि राजकीय नेत्यांची उपस्थिती यावर भर दिला जातो. पण दुष्काळग्रस्त गावांमध्ये जाऊन शेतकऱ्यांच्या डोळ्यांतील अश्रू पुसण्यासाठी किती राजकीय नेते पुढे येतात? राष्ट्रपती येतात, मुख्यमंत्री येतात, मंत्री येतात, अधिकारी येतात. धार्मिक कार्यक्रमाला राष्ट्रीय स्तरावर महत्त्व मिळते, ही चांगली बाब आहे. पण याच मान्यवरांनी दुष्काळग्रस्त भागातील गावांनाही भेट द्यावी. शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन त्यांची परिस्थिती पाहावी. पाणीटंचाईने त्रस्त असलेल्या महिलांशी संवाद साधावा.

राष्ट्रपतींच्या उपस्थितीत ध्वजारोहण होत असताना महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्त जनतेच्या प्रश्नांकडेही देशाचे लक्ष वेधले गेले पाहिजे.

आपण धार्मिक परंपरांचा सन्मान करतो. कुंभमेळ्याला विरोध करत नाही. भाविकांच्या श्रद्धेचा अपमान करण्याचा प्रश्नच नाही. पण श्रद्धेच्या बरोबरीने माणुसकी, सामाजिक जबाबदारी आणि जनतेचे मूलभूत प्रश्न यांनाही तितकेच महत्त्व दिले पाहिजे.

धार्मिक कार्यक्रमासाठी हजारो कोटींचा विकास आराखडा तयार होऊ शकतो, तर दुष्काळमुक्त महाराष्ट्रासाठी तितक्याच गांभीर्याने दीर्घकालीन आराखडा का तयार होत नाही?

कुंभमेळ्यासाठी कायमस्वरूपी पायाभूत सुविधा निर्माण होणार असतील, तर शेतकऱ्यांसाठी कायमस्वरूपी सिंचन व्यवस्था का निर्माण होत नाही?

भाविकांसाठी पाण्याचे नियोजन होऊ शकते, तर तहानलेल्या गावांसाठी पाण्याचे नियोजन का होऊ नये

धार्मिक कार्यक्रमातून पर्यटन आणि रोजगार वाढवण्याचा विचार होतो, तर शेती आणि ग्रामीण अर्थव्यवस्था सक्षम करण्यासाठी तितकीच इच्छाशक्ती का दाखवली जात नाही?

महाराष्ट्र सरकारने हे लक्षात ठेवावे की कुंभमेळा काही महिन्यांचा किंवा वर्षभराचा धार्मिक सोहळा असेल; पण शेतकरी, शेतमजूर आणि सामान्य नागरिकांचे प्रश्न कायमस्वरूपी आहेत.

आपल्याला कुंभमेळाही भव्य हवा आणि महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचे जीवनही समृद्ध हवे. यामध्ये विरोधाभास असण्याचे कारण नाही. प्रश्न एवढाच आहे की सरकारी तिजोरीतील पैसा खर्च करताना माणसाच्या जगण्याला प्रथम प्राधान्य मिळणार की केवळ भव्य आयोजनाला?

छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि संतांच्या महाराष्ट्रात आज आपल्याला पुन्हा एकदा विचार करावा लागणार आहे.

कारण मंदिरातील दिवे उजळत असताना शेतकऱ्याच्या घरातील चूल विझलेली असेल, तर तो विकास नाही. धार्मिक ध्वज आकाशात अभिमानाने फडकत असताना दुष्काळग्रस्त शेतकऱ्याच्या डोळ्यांत अश्रू असतील, तर ती आपल्या व्यवस्थेसाठी चिंतेची बाब आहे.

धर्म माणसाला जोडण्यासाठी असतो, माणसाच्या वेदना विसरण्यासाठी नाही. म्हणूनच आज महाराष्ट्राला केवळ भव्य कुंभमेळ्याची नव्हे, तर भुकेल्याला अन्न, तहानलेल्याला पाणी आणि शेतकऱ्याला जगण्याची हमी देणाऱ्या राज्यकारभाराची गरज आहे!

साप्ताहिक. संघर्षाचा आवाज मालक – यशोदा उत्तरेश्वर सोनवणे, यांनी सा. संघर्षाचा आवाज संपादक, मुद्रक, प्रकाशक संजय सोनवणे यांना सर्व अधिकार दिले आहे. त्यांनी श्री साई ग्राफिक्स, डी. एस. के. चिंतामणी कॉम्प्लेक्स. विंग – सी – २, शॉप नं. ३८, शनिवार पेठ, पुणे – ४११०३० येथे छापून सर्व्हे नं. ८, नेताजीनगर, येरवडा, पुणे – ४११००६ येथून प्रकाशित केले.

Yashoda Uttareshwar Sonwane, the owner of Weekly Sangharshacha Aawaz, has given all rights to the Sanjay Uttareshwar Sonwane, editor, printer, publisher of Weekly Sangharshacha Aawaz. This weekly is printed at Shri Sai Graphics, D. S. K. Chintamani Complex, Wing C-2, Shop No. 38, Shaniwar Peth, Pune - 411030 and published at Survey No. 8 Netajinagar, Yerawada, Pune - 411006.

या साप्ताहिकात प्रसिध्द झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर प्रकरणे पुणे न्यायालयांतर्गत सोडवली जातील अन्यत्र कोठेही नाही.

आपल्या प्रतिक्रिया येथे नोंदवाव्यात

Email : sangharshachaaawaz@rediffmail.com, Email : sangharshachaaawaz22@gmail.com
Mob. : 7276871008 / 9665487134



पुणे शहरात अनधिकृत रस्ता खोदाई जोरात असताना सत्ताधारी,...

(पान १ वरून) इतर कारणांसाठी पुणे महापालिकेच्या पथ विभागाकडून रस्ते खोदाईसाठी सशुल्क १ ऑक्टोबर ते ३१ एप्रिलपर्यंत परवानगी दिली जाते. त्यानंतर पुढील महिनाभरात रस्ते दुरूस्त केले जातात. पावसाळ्यापूर्वी पथ विभागाकडून शहरातील रस्ते दुरूस्ती केली जात आहे. अनेक रस्ते डांबरीकरण करून चकाचक केले जात आहेत. ज्या रस्त्यांचे डांबरीकरण झाले, त्या रस्त्यावर खोदाईसाठी कोणालाही परवानगी दिली जाणार नाही. असे पथ विभागाचे अधिकारी सांगतात. मात्र याच अधिकाऱ्यांना अंधारात ठेवून अनेक ठिकाणी डांबरीकरण केल्यानंतर काही दिवसातच रस्ते पुन्हा खोदल्याचे प्रकार उघडकीस आले आहेत. पालिकेच्या रस्त्यांचे खोदाईने नुकसान होते व दुरूस्तीसाठी मोठा खर्चही करावा लागतो. पण पुणे शहरातील रस्त्याची अवस्था पाहता पावसाळ्यापुर्वी काम केल्याचे दिसत नाही? म्हणूनच भर पावसाळ्यामध्ये पुणेकरांनी पाण्यात उतरून आंदोलन केल्याने खड्डे दुरूस्त करण्याचे काम मोठ्या प्रमाणात करण्यात आल्याचे आपण पाहिले आहे. पुणे महानगरपालिका आपल्याच नियमावली व अटी-शर्तीकडे दुर्लक्ष करत आहे हे दिसून येत आहे. यामुळे पुणेकरांच्या पैशाचा अपव्यय होतो. याशिवाय खराब रस्त्यामुळे वाहनचालकांना मोठ्या समस्येला सामोरे जावे लागत आहे. एकीकडे १ ऑक्टोंबर ते ३१ एप्रिलपर्यंत रस्ते खोदाईसाठी सशुल्क परवानगी दिली जाते. त्यानंतर डांबरीकरण करून रस्ता चकाचक केला जातो. तरीही दरवर्षी पावसाळ्यापुर्वी ३.५ ते ४ कोटीची कामे प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयनिहाय लावली जातात. असे एकूण ५२ ते ६२ कोटींची कामे लावली गेली. त्या कामाचा अहवाल येतो ना येतो की, लगेच कामे लावली जातात. नुकतेच पुणे महापालिकेने करोडो रूपयांची कामे लावली आहेत. यामध्ये खात्याचे नाव-पथ विभाग, कामाचे नाव-पुणे मनपा कार्यक्षेत्रात जागतिक दर्जाचे फुटपाथ विकसित करणे (भाग क्र. १ ते ७) एकूण निविदा रक्कम ५७,८८,०४,८१६/- (सत्तावन्न कोटी अठ्ठ्याऐंशी लाख चार हजार आठशे सोहळा रूपये)

तसेच दुसरे काम खात्याचे नाव-पथ विभाग, कामाचे नाव-पथ विभागाकडील क्षेत्रीय कार्यालयांच्या कार्यक्षेत्रातील पुणे मनपाच्या विविध खात्यांनी भूमिगत सेवा वाहिन्या टाकणेकरिता रस्त्याच्या खोदाईचे रिइनस्टेटमेंट करणे तसेच तद्नुषंगिक कामे करणे (भाग क्र १ ते ७) एकूण निविदा रक्कम ५७,९०,४०,८२८/- (सत्तावन्न कोटी नव्वद लाख चाळीस हजार आठशे अठ्ठावीस रूपये) याकामाची निविदा विक्री कालावधी दिनांक ३०/१०/२०२६ ते २३/११/२०२६, ०२.३० दुपारी पर्यंत, स्वीकृती दिनांक ३०/१०/२०२६ ते २३/११/२०२६, ०२.३० दुपारी पर्यंत, तांत्रिक निविदा उघडणे प्रक्रिया दिनांक २५/११/२०२६, ०३.०० दुपारी असा आहे. मग प्रश्न पडतो गेल्यावर्षी पुणे शहरात रस्त्याचे काम केले होते का? केले होते तर मग पुण्यात खड्ड्याचे साम्राज्य का निर्माण झाले. आणि आत्ता रक्कम ५७,९०,४०,८२८/- (सत्तावन्न कोटी नव्वद लाख चाळीस हजार आठशे अठ्ठावीस रूपये) रिइनस्टेटमेंटच्या काम करत असताना पावसाळ्यापुर्वी कामाच्या ३.५ ते ४ करोड प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयनिहाय याप्रमाणे एकूण ५२ ते ६२ कोटींची कामावर अगोदरच खर्च करण्यात आले. त्याचे काय झाले? याचा अहवाल सार्वजनिक न करण्यामागे काय कारण असू शकते? असा प्रश्न पुणेकरांना पडला आहे. पुणे शहरातील सत्ताधारी, विरोधक, विविध गटनेते आणि प्रशासन प्रमुख याकडे केव्हा गांभीर्याने पाहणार हे महत्वाचे आहे. कारण नुकतेच प्रभाग क्र.१३ मधील कॅम्प जीपीओ पोस्ट ऑफिस जवळ एमएनजीएल कंपनीकडून खोदकाम करत असतांना १० ते १२ इंचाचे जलवाहिनी फुटल्याबाबत व त्या कामाच्या दुरूस्तीचा खर्च र.रू.२,५४,७७५/- पाणीपुरवठा विभागाकडे करणेबाबत कार्यकारी अभियंता स्वारगेट पाणीपुरवठा क्र.२, पुणे महानगरपालिका, जावक क्र.१०२६, वि.२९/१०/२०२६ रोजी मा.कार्यकारी अभियंता, पथ विभाग, पुणे महानगरपालिका यांना पत्रव्यवहार करण्यात आला. यामध्ये ते म्हणतात की, उपरोक्त विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येत आहे की आपल्या पथ विभागामार्फत देण्यात आलेल्या रस्ता खोदाईच्या कार्यादेशानुसार एमएनजीएल कंपनीचे प्रभाग क्र.१३ मधील कॅम्प जीपीओ परिसरात गॅस पाईपलाइन टाकायचे काम सुरू होते. सदर काम सुरू असतांना एमएनजीएल कंपनीच्या निष्काळजीपणामुळे तेथील मुख्य १० व्यासाची पिण्याच्या पाण्याची लाईन फुटली त्यामुळे लाखो लीटर पिण्याच्या पाण्याचा अपव्यय झाला.

परिसरातील पाणीपुरवठा अचानक खंडित झाल्यामुळे स्थानिक नागरिकांचे व लोकप्रतिनिधी यांच्या प्रचंड रोषास पाणीपुरवठा विभागातील कर्मचाऱ्यांना सामोरे जावे लागले. पाणीपुरवठा ही अत्यावश्यक सेवा असल्याने नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी पाणीपुरवठा विभागाच्या कर्मचाऱ्यांनी तातडीने दुरूस्ती काम सुरू केले.

सदर दुरूस्ती मनपामार्फत करण्यात यावी व केलेल्या कामाचे बिल हे एमएनजीएल मार्फत अदा करण्यात येईल असे जागा पाहणीच्या वेळी एमएनजीएल च्या प्रतिनिधी यांनी सांगितले आहे.

सदर दुरूस्ती तातडीने करण्यात आली असून त्या ठिकाणी करण्यात आलेल्या कामाचे बिल इस्टिमेट सोबत जोडले आहे. तरी त्यानुसार एमएनजीएल कडून र.रू.२,५४,७७५/- इतके वसूल करून xl12E101 या वरील अर्थशीर्षकावर जमा करून खात्यास कळविणेची विनंती आहे. पण या पत्रव्यवहारामध्ये पाणीपुरवठा विभागाकडून संदर्भ जे देण्यात आले आहेत. त्यामध्ये १) पथ विभागामार्फत एमएनजीएल कंपनीस देण्यात आलेला रस्ता खोदाईचा कार्यादेश आणि २) वि.२३/१०/२०२६ रोजी जागा पाहणी असे दिले आहे. हे विशाभूल करण्याचे आणि टाळाटाळ करण्याचे अधिकाऱ्यांचे लक्षण दिसून आली आहेत. कारण ज्यावेळी जीपीओ पोस्ट ऑफीसजवळ एमएनजीएल कंपनीकडून खोदकाम करत असताना १० ते १२ इंचाची जलवाहिनी फुटली तेंव्हा ठेकेदाराला विचारण्यात आले. तेंव्हा त्यांनी सांगितले की, सध्या रस्ता खोदाईचा कार्यादेश अजून मिळालेला नाही. लवकरच मिळणार आहे. म्हणून काम चालू आहे. असे त्यांनी सांगितले. त्यानंतर जलवाहिनी फुटल्यानंतर ती दुरूस्त करण्यासाठी पाणीपुरवठा विभागाचे अधिकारी तेथे आले. त्यांनी काम पूर्ण करून निघून गेले अनधिकृत रस्ते खोदाई करणारे जवळ-जवळ सार्वजनिक सुट्ट्या बघून कामे करतात. आणि यांना कनिष्ठ अधिकारी उपअभियंता यांचा सहभाग असतो. असे वाटते. कारण एमएनजीएल कंपनीकडून जलवाहिनी फुटल्याबाबत नोटिस पाठविली का असे वारंवार चौकशी केल्यानंतर नोटीस देण्यात आली. दि.२३/१०/२०२६ रोजी पाणीपुरवठा विभागाकडून दुरूस्ती करण्यात आली. दि.२९/१०/२०२६ रोजी वारंवार चौकशी केल्यामुळेच पाणीपुरवठा विभागाकडून २,५४,७७५/- रूपये दुरूस्तीचा खर्च पथ विभागाकडे मागण्यात आला आहे. आता पथ विभाग एमएनजीएल कंपनीवर काय कारवाई करते. हा मोठा प्रश्न आहे. कारण पुणे शहरात कॅम्प जीपीओ पोस्ट ऑफीस असो किंवा खुळेवाडी, खराडी सबस्टेशन रोड, नगररोड, चोखीदाणी रस्ता असो सगळीकडेच विनापरवानगी बिनधास्तपणे खोदाई चालू आहे. याच खुळेवाडी, खराडी सबस्टेशन रोड, नगररोड, चोखीदाणी रस्ता खोदाईसाठी वि.६/२/२०२५ रोजी मे.गेरा.डेव्हलपमेंट प्रा.लिमिटेड यांनी मुख्य अभियंता पथ विभागाकडे अर्ज केला होता. त्याअनुषंगाने खोदाई शुल्कापोटी ४ कोटी २६ लाख ७२ हजार रूपये भरून घेण्यात आले आहेत. मग याच ठिकाणी अशा कोणत्या विकसकासाठी अनधिकृतपणे विद्युत लाईन टाकण्यासाठी कामे चालू आहेत. यासंदर्भात संबंधित अधिकाऱ्यांना माहिती देवूनही वेगवेगळी उत्तरे देण्यात आली आहेत. यासर्वांमध्ये पुणेकरांच्या कररूपी करोडो रूपयांची उधळपट्टी होत आहे. आणि याच उधळ पट्टीपतून सत्ताधारी, विरोधक, विविध गटनेते आणि प्रशासन प्रमुख कोणता विकास साधत आहेत? हा प्रश्नच आहे.

यापुढे जावून पथ विभागाचे मुख्य अभियंता श्री.राजेश बनकर यांनी आपल्या अंतर्गत असलेल्या अधिकाऱ्यांच्या कारभाराकडे लक्ष देण्यात यावे. ते परस्पर दुर्लक्ष करून किंवा एखाद्या अनधिकृत कामात सहभागी होतात? अशी दाट शंका निर्माण होत आहे.

ज्ञानेश कुमार यांचा मनमानी कारभार चालणार नाही; मताधिकार वाचवण्यासाठी वंचित बहुजन आघाडीचे मुंबईत आंदोलन!

ॲड. प्रकाश आंबेडकर : आम्ही दोषी होऊ इच्छित नाही, आमचा मताचा अधिकार आम्हाला शाबूत ठेवायचा आहे



मुंबई : राजगृह, दादर (पूर्व), मुंबई येथे वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी होणाऱ्या मुंबई मोर्चाच्या पार्श्वभूमीवर माध्यमांशी चर्चा केली. निवडणूक आयोगाचे मुख्य आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या मनमानी कारभारावर तीव्र टीका केली. आणि मतदारांच्या नावांमध्ये होणारी वगळणी, एसआयआर प्रक्रिया आणि फॉर्म सहासंदर्भातील प्रश्न उपस्थित केले.

ॲड. आंबेडकर म्हणाले की, मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी मनमानी कारभार चालवलेला आहे. त्यांना जे दोन सहकारी आहेत, त्या दोन सहकाऱ्यांनी गेल्या वर्षभरात अनेक पत्रे पाठविली आहेत. मुख्य निवडणूक आयुक्तांने घेतलेल्या स्वतंत्र निर्णयांच्या संदर्भातही त्यांनी वक्तव्य केले. महाराष्ट्राचे चीफ इलेक्टोरल ऑफिसर चोकलिंग यांनी चीफ इलेक्शन कमिशनला पत्र लिहून एसआयआर आणि फॉर्म सहा योग्य नसल्याचे सांगितले असून, यासंदर्भात नव्याने मार्गदर्शन करण्याची मागणी केली.

या प्रकरणातील सर्वांत मोठा जबाबदार घटक भारताचे सरन्यायाधीश असल्याचा आरोप त्यांनी केला. जजमेंट देताना संसदेच्या अधिकारांवर मर्यादा आणण्यात आल्याचे ते म्हणाले. संसदेने निवडणूक आयोगाला दरवर्षी इलेक्टोरल रोल रिव्हाइज करण्याचा अधिकार दिला असून, जानेवारी महिन्यात ही प्रक्रिया पार पाडली पाहिजे, असे कायद्याच्या माध्यमातून सांगितले आहे. तसेच, एखाद्या मतदारसंघात किंवा मतदारसंघाच्या एखाद्या भागात तक्रार प्राप्त झाल्यास विशेष पुनर्निरीक्षणाचे अधिकार निवडणूक आयोगाला देण्यात आले आहेत.

मी 'कलिप्रेट' हा शब्द जाणीवपूर्वक वापरला आहे, असे सांगत निवडणूक आयोगाने संसदेने घालून दिलेल्या मर्यादा ओलांडल्याचा आरोप केला. मतदारसंघ किंवा मतदारसंघाच्या एखाद्या भागापुरते मर्यादित असलेले अधिकार संपूर्ण राज्यात एसआयआर राबवण्यासाठी वापरण्यात आल्याचे ते म्हणाले. भारताच्या सरन्यायाधीशांनी संसदेचे अधिकार वापरून १९५० च्या रिप्रेझेंटेशन ऑफ पीपल्स ॲक्टमधील कलमाचा आवाका वाढवून निवडणूक आयोगाला वाचवण्याचा प्रयत्न केल्याचा आरोपही त्यांनी केला.

मुख्य निवडणूक आयुक्ताला पदावरून हटवण्याचे अधिकारही संसदेकडे असल्याचे सांगून, हे प्रकरण निकालात काढण्यासाठी आवश्यक ते सर्व मार्ग अवलंबले जात असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

आज छत्रपती शिवाजी महाराज स्टेशन येथे निदर्शने करून आंदोलन आणि पक्षाच्या मागण्या जिवंत असल्याचे दाखवण्याचा प्रयत्न आहे असे ते म्हणाले. लोकांमध्ये राग आणि चीड असल्याचे सांगत, हा राग वाढल्यास परिस्थिती शासनाच्या हाताबाहेर जाऊ शकते, असा इशाराही त्यांनी दिला. चुकीच्या गोष्टी घडवून आणणाऱ्यांना आधीच थांबवले पाहिजे, असे त्यांनी सांगितले.

पुढे ते म्हणाले की, महाराष्ट्रातून अडीच कोटी मतदारांची नावे वगळली जाण्याची शक्यता असल्याचे वंचित बहुजन आघाडीने आधीच सांगितले होते, आता अडीच ते सव्वादोन कोटी नावे वगळली जाणार असल्याची परिस्थिती असल्याचे ते म्हणाले. अनेक व्यक्तींना मृत दाखवण्यात आले; मात्र त्या जिवंत असून, ते निवडणूक आयोगासमोर येऊन त्यांची नावे पुन्हा मतदारयादीत समाविष्ट करण्याची मागणी करत असल्याचे त्यांनी सांगितले.

तसेच मतदारयादीतून नाव वगळल्यानंतर ते पुन्हा समाविष्ट करण्यासाठी फॉर्म सहा भरण्यास सांगितले जात असल्याचा मुद्दाही त्यांनी उपस्थित केला. फॉर्म सहा हा नव्याने मतदार होणाऱ्या, वयाची १८ वर्षे पूर्ण झालेल्या आणि पहिल्यांदा मतदान करणाऱ्या व्यक्तींसाठी असल्याचे ते म्हणाले. या फॉर्ममध्ये यापूर्वी मतदान केलेले नसल्याचे प्रतिज्ञापत्र द्यावे लागते. मात्र, आधी मतदान केलेल्या आणि आता मतदारयादीतून नाव वगळलेल्या व्यक्तींनी असे प्रतिज्ञापत्र दिल्यास त्यांच्यावर सात वर्षांच्या कारावासाची कारवाई होऊ शकते, अशी भीती त्यांनी व्यक्त केली.

निवडणूक आयोगाच्या चुकीमुळे नागरिकांना गुन्हेगार ठरवले जाण्याची शक्यता असल्याचा आरोप करत त्यांनी हा गंभीर मुद्दा असल्याचे सांगितले. वगळण्यात आलेली नावे पुन्हा समाविष्ट करण्याच्या प्रक्रियेमुळे संबंधित मतदार अडचणीत येऊ शकतात आणि त्यांच्या विरोधकांना त्याचा फायदा मिळू शकतो, असेही ते म्हणाले.

आम्ही गुन्हेगार होऊ इच्छित नाही. आमचा मताचा अधिकार आम्हाला शाबूत ठेवायचा आहे, असे सांगत त्यांनी मुंबईकरांना मोर्चात सहभागी होण्याचे आवाहन केले. मतदारांच्या अधिकारांचे संरक्षण करण्यासाठी आणि या गंभीर प्रश्नाकडे लक्ष वेधण्यासाठी हा मोर्चा असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

वंचित बहुजन आघाडीने यासंदर्भात याचिका दाखल केली होती. त्यावेळी इतरांना सोबत घेण्याचे आवाहन केले होते; मात्र कोणीही पुढे आले नाही, असे त्यांनी सांगितले. मुंबई उच्च न्यायालयात या प्रकरणावर वंचित बहुजन आघाडीशिवाय दुसरे कोणीही लढत नसल्याचे सांगत, याचिका फेटाळण्यात आल्याचा उल्लेख त्यांनी केला. त्यावेळेस जर सगळे आमच्याबरोबर आले असते, तर ही परिस्थिती आताच्या टप्प्यापर्यंत आली नसती, असे ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी सांगितले.







दीपावलीचा प्रकाश
आपल्या जीवनात
सुख, समृद्धी, आरोग्य आणि
आनंद घेऊन येवो!

गणेश बिडकर

सभागृह नेता, पुणे महानगरपालिका

सत्यनिष्ठेतून समृद्धीकडे : भ्रष्टाचारमुक्त समाजाची गरज...

(पान ४ वरून) देऊन काम करून घेणे या कृती भ्रष्ट व्यवस्थेला बळ देतात. त्यामुळे भ्रष्टाचाराविरोधात बोलताना स्वतःच्या वर्तनाचेही परीक्षण करणे आवश्यक आहे. अधिकृत शुल्क भरणे, पावती घेणे, नियमांचे पालन करणे, चुकीच्या मागण्यांना नकार देणे आणि आवश्यकतेनुसार सक्षम यंत्रणेकडे तक्रार करणे ही जबाबदार नागरिकांची कर्तव्ये आहेत. सार्वजनिक मालमत्तेचे संरक्षण, कर भरणे आणि सार्वजनिक नियमांचे पालन करणे यांमधूनही सामाजिक प्रामाणिकपणा व्यक्त होतो.

शिक्षणसंस्था आणि युवकांची भूमिका भ्रष्टाचारमुक्त समाजनिर्मितीत अत्यंत महत्त्वाची आहे. शाळा, महाविद्यालये आणि विद्यापीठांमध्ये विद्यार्थ्यांना प्रामाणिकपणा, न्याय, समता, सार्वजनिक हित आणि सामाजिक उत्तरदायित्व यांची जाणीव करून दिली पाहिजे. निबंध, वक्तृत्व, चर्चासत्रे, प्रश्नमंजुषा आणि जनजागृती उपक्रमांद्वारे भ्रष्टाचाराचे परिणाम समजावून सांगता येतात. परीक्षेत गैरप्रकार न करणे, संशोधनात साहित्यचौर्य टाळणे, शैक्षणिक कामात पारदर्शकता राखणे आणि संस्थात्मक नियमांचे पालन करणे यांपासून सच्चोटीची सुरुवात होते. युवक डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर करून शासकीय योजनांची माहिती मिळवू शकतात, सार्वजनिक निधीच्या वापराबाबत प्रश्न विचारू शकतात आणि ऑनलाइन तक्रार यंत्रणांचा जबाबदारीने उपयोग करू शकतात. मात्र, समाजमाध्यमांवर अप्रमाणित आरोप किंवा चुकीची माहिती पसरविण्याऐवजी तथ्यांची पडताळणी करूनच जनजागृती करणे आवश्यक आहे.

महिला बचतगट, स्वयंसेवी संस्था आणि सामाजिक संघटनाही भ्रष्टाचारविरोधी जनजागृतीत महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. ग्रामीण भागातील महिला बचतगट हे केवळ आर्थिक व्यवहारांचे व्यासपीठ नसून सामाजिक जागरूकता आणि सामूहिक निर्णयक्षमतेचे माध्यम बनू शकतात. सार्वजनिक वितरण व्यवस्था, पाणीपुरवठा, शाळांमधील सुविधा, आरोग्यसेवा आणि स्थानिक विकासकामांबाबत महिला संघटितपणे प्रश्न उपस्थित करू शकतात. स्वयंसेवी संस्थांनी नागरिकांना कायदेशीर अधिकारांची माहिती द्यावी, तक्रार नोंदविण्याच्या प्रक्रियेबाबत मार्गदर्शन करावे आणि प्रशासनाशी रचनात्मक संवाद साधावा. भ्रष्टाचारविरोधी चळवळ ही केवळ दोष दाखविणारी न राहता चांगल्या प्रशासनासाठी लोकसहभाग वाढविणारी असली पाहिजे.

भ्रष्टाचाराचे आर्थिक परिणामही दूरगामी असतात. सार्वजनिक निधीचा अपव्यय झाल्यास शिक्षण, आरोग्य, रोजगार, शेती, पाणीपुरवठा आणि पायाभूत सुविधांसाठी उपलब्ध असलेली साधने कमी पडतात. निकृष्ट दर्जाची कामे झाल्यास त्यांच्या दुरुस्तीसाठी पुन्हा सार्वजनिक पैसा खर्च करावा लागतो. उद्योग आणि व्यवसाय क्षेत्रात लाचलुचपत किंवा पक्षपात वाढल्यास प्रामाणिक उद्योजकांचा उत्साह कमी होतो आणि समान स्पर्धेचे वातावरण बाधित होते. याउलट, नियमांची स्पष्टता, समान संधी, पारदर्शक निर्णयप्रक्रिया आणि विश्वासार्ह संस्था यांमुळे आर्थिक व्यवहारांना स्थैर्य मिळते. सार्वजनिक निधीचा योग्य वापर झाल्यास विकासाचे लाभ अधिक व्यापक समाजघटकांपर्यंत पोहोचू शकतात. त्यामुळे सत्यनिष्ठा ही केवळ वैयक्तिक नैतिकता नसून शाश्वत आर्थिक समृद्धीची आवश्यक अट आहे.

यंदाच्या सप्ताहात तंत्रज्ञानाच्या माध्यमातून परिवर्तन घडविण्याच्या संकल्पनेलाही विशेष महत्त्व देण्यात आले आहे. ३० ऑक्टोबर २०२६ रोजी केंद्रीय दक्षता आयोगाच्या वतीने 'तंत्रज्ञानाद्वारे परिवर्तन' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता, माहिती विश्लेषण, डिजिटल नोंदी आणि स्वयंचलित प्रणाली यांच्या साहाय्याने व्यवहारांमधील अनियमितता शोधणे, प्रक्रियेतील विलंब कमी करणे आणि दक्षता प्रशासन अधिक परिणामकारक करणे शक्य होऊ शकते. तथापि, तंत्रज्ञानाचा वापर करताना नागरिकांच्या वैयक्तिक माहितीची गोपनीयता, माहितीची सुरक्षितता आणि संगणकीय प्रणालींमधील संभाव्य पक्षपात यांची काळजी घेणे आवश्यक आहे. तंत्रज्ञान हे पारदर्शकता आणि कार्यक्षमता वाढविण्याचे साधन असले पाहिजे; ते उत्तरदायित्व टाळण्याचे माध्यम बनता कामा नये.

भ्रष्टाचारमुक्त समाज घडविण्यासाठी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी आणि नैतिक मूल्यांची जपणूक या दोन्ही गोष्टी आवश्यक आहेत. भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ आणि त्यातील २०१८ मधील सुधारणा यांद्वारे लाचलुचपत व भ्रष्ट आचरणाविरुद्ध कायदेशीर तरतुदी करण्यात आल्या आहेत. मात्र, कायदे अस्तित्वात असणे पुरेसे नाही; त्यांची निष्पक्ष आणि परिणामकारक अंमलबजावणी होणेही आवश्यक आहे. तपास यंत्रणांनी पुराव्यांच्या आधारे चौकशी करावी, दोषींवर कायद्यानुसार कारवाई करावी आणि निरपराध व्यक्तींना अन्यायकारक त्रास होणार नाही याची दक्षता घ्यावी. सार्वजनिक पदांवरील व्यक्तींनी हितसंबंधांचा संघर्ष टाळावा, निर्णयांमध्ये निष्पक्षता राखावी आणि वैयक्तिक लाभापेक्षा सार्वजनिक हिताला प्राधान्य द्यावे. कायद्याचे राज्य टिकविण्यासाठी सर्वांना समान नियम लागू असणे ही लोकशाहीची मूलभूत अट आहे.

दक्षता जनजागृती सप्ताहाचा खरा अर्थ सप्ताह संपल्यानंतरही त्यातील मूल्ये आपल्या दैनंदिन जीवनात टिकवून ठेवण्यात आहे. २६ ऑक्टोबर ते १ नोव्हेंबर हा कालावधी जनजागृतीसाठी महत्त्वाचा असला, तरी सत्यनिष्ठेचे पालन वर्षातील प्रत्येक दिवशी झाले पाहिजे. सरकारी कार्यालयांपासून ग्रामपंचायतीपर्यंत, शैक्षणिक संस्थांपासून उद्योगव्यवसायापर्यंत आणि सार्वजनिक जीवनापासून वैयक्तिक व्यवहारांपर्यंत पारदर्शकता व उत्तरदायित्वाची संस्कृती रुजली पाहिजे. भ्रष्टाचाराविरोधात केवळ घोषणा देण्याऐवजी त्याला पोषक असलेल्या सवयी, पद्धती आणि मानसिकता बदलण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. प्रत्येक नागरिकाने स्वतःपासून सुरुवात केली, प्रत्येक संस्थेने आपली जबाबदारी स्वीकारली आणि प्रत्येक सार्वजनिक पदावरील व्यक्तीने अधिकारांचा वापर जनहितासाठी केला, तर परिवर्तन शक्य आहे. 'सत्यनिष्ठेतून समृद्धी' ही संकल्पना भारताच्या उज्ज्वल भविष्याचा मार्ग दाखविणारी आहे. समृद्धीचा अर्थ केवळ संपत्तीची वाढ नसून न्याय्य संधी, गुणवत्तापूर्ण सार्वजनिक सेवा, सामाजिक सुरक्षितता, विश्वासार्ह प्रशासन आणि सन्मानाने जगण्याची हमी असा व्यापक आहे. भ्रष्टाचारामुळे विकासाचे लाभ काही मोजक्या व्यक्तींपर्यंत मर्यादित राहतात; तर प्रामाणिक आणि पारदर्शक व्यवस्थेमुळे त्यांचा लाभ समाजातील सर्व घटकांपर्यंत पोहोचू शकतो. म्हणूनच भ्रष्टाचारमुक्त भारताची निर्मिती ही केवळ शासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे सामूहिक ध्येय असले पाहिजे. दक्षता जनजागृती सप्ताहाच्या निमित्ताने आपण प्रामाणिकपणाचा संकल्प करूया, चुकीच्या व्यवहारांना प्रोत्साहन देणार नाही, सार्वजनिक संपत्तीचे संरक्षण करू आणि अन्यायाविरुद्ध कायदेशीर मार्गाने आवाज उठवूया. कारण ज्या समाजात सत्यनिष्ठा ही व्यक्तीची ओळख आणि प्रशासनाचा स्वभाव बनते, त्याच समाजात विश्वास, न्याय आणि समृद्धीची भक्कम पायाभरणी होते.





सर्व नागरिकांना दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा





राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार



शुभेच्छुक

मा.सोपान उर्फ काका चव्हाण

गटनेता - पुणे महानगरपालिका
(राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार)
अध्यक्ष - धारेश्वर विद्या व क्रीडा प्रतिष्ठान, धायरी



सर्व नागरिकांना

दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा

सौ. अर्चना पाटील

नगरसेविका प्रभाग क्रमांक 22 (क)
सदस्या : महिला व बालकल्याण समिती, पुणे महानगरपालिका
मा. महिला अध्यक्ष, भारतीय जनता पार्टी, पुणे शहर
मा. स्थायी समिती सदस्य, पुणे महानगरपालिका

शुभेच्छुक

मा. तुषार पाटील

उपाध्यक्ष,
भारतीय जनता पार्टी, पुणे शहर



सर्व नागरिकांना

'दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!

ही दीपावली आपल्या सर्वांच्या आयुष्यात
सुख, शांती, समृद्धी आणि आनंद घेऊन येवो, हीच सदिच्छा !

शुभेच्छुक

मा. सुहास टिंगरे

नगरसेवक, पुणे महानगरपालिका,
सदस्य स्थायी समिती पुणे महानगरपालिका.






दीपोत्सवाचा प्रकाश
प्रत्येकाच्या जीवनात
सुख, समृद्धी, उत्तम आरोग्य आणि
आनंद घेऊन येवो, हीच सदिच्छा !

शुभ दीपावली

आपणास व आपल्या परिवारास
दीपावलीच्या मंगलमय शुभेच्छा!



श्रीनाथ भिमाले
अध्यक्ष - स्थायी समिती पुणे महानगरपालिका
मा.सभागृह नेते पुणे मनपा


सर्व नागरिकांना
दिपावलीच्या
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक
ऍड.अविनाशदादा साळवे, नगरसेवक
पुणे महानगरपालिका


सर्व नागरिकांना
दीपावलीच्या
हार्दिक शुभेच्छा..!
शुभेच्छुक
मा. पृथ्वीराज शशिकांत सुतार
नगरसेवक, पुणे मनपा | मा. गटनेते, पुणे मनपा | मा. संचालक, पुणे स्मार्ट सिटी


सर्व नागरिकांना
दीपावलीच्या
हार्दिक शूभेच्छा
मा.नंदिनीताई सिद्धार्थ धेंडे
नगरसेविका, पुणे महानगरपालिका
शुभेच्छुक
मा.डॉ.सिद्धार्थ धेंडे
मा.उपमहापौर, पुणे महानगरपालिका